द्राक्ष उत्पादन तंत्र

# रोगांच्या नियंत्रणासाठी कॅनोपी व्यवस्थापन

डॉ. स. द. रामटेके,
स्नेहल खलाटे, अमृता लंगोटे

सध्या बऱ्याचशा बागा या फुलोरा ते सेटिंग अवस्थेत आहेत. या काळात बागेतील आर्द्रता ८० टक्क्यांपर्यंत पोहोचली, तर वाढलेल्या आर्द्रतेमुळे वेलीच्या वाढीचा जोमदेखील तितक्याच प्रमाणात वाढलेला दिसून येईल. परिणामी, बागेत बगलफुटी जास्त प्रमाणात वाढतील. तसेच शेंडाही तितक्याच प्रमाणात वाढेल. यामुळे कॅनॉपी वाढून गर्दी निर्माण होण्याची शक्यता आहे. बऱ्याच बागांमध्ये गर्दी झाल्यामुळे डाऊनी मिल्ड्यूचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात दिसून येतो. ज्या ठिकाणी शेंड्याकडील वाढ जास्त प्रमाणात दिसून येते, तेथे करपा रोगाचा प्रादुर्भाव जास्त दिसून येतो. दाट कॅनॉपीमुळे द्राक्षवेलीमध्ये विविध रोगांचा प्रादुर्भाव दिसून येतो. त्यासाठी रोग नियंत्रणाच्या दृष्टीने फळ छाटणीनंतर बागेमध्ये काटेकोर कॅनॉपी व्यवस्थापन करणे फायद्याचे ठरते.

डाऊनी मिल्ड्यूसारख्या रोगांचा प्रादुर्भाव हा वेलीवर वाढलेल्या बगलफुटीमुळे जास्त प्रमाणात होतो. बगलफुटी काढल्यामुळे कॅनॉपी मोकळी होऊन हवा खेळती राहण्यास मदत होईल. आणि रोगाच्या प्रसारासाठी सूक्ष्म वातावरण तयार होणार नाही. मोकळ्या कॅनॉपीमुळे फवारणीचे कव्हरेज चांगले होऊन रोगांवर प्रभावी नियंत्रण मिळविता येते. बागेत वेल विस्ताराचा उपयोग हा उत्पादन वाढवण्यासाठी, फळांची गुणवत्ता सुधारण्यासाठी, रोगाचा धोका कमी करण्यासाठी आणि बागेतील कामे सुलभ करण्यासाठी केला जातो. यासाठी विशेषतः फांद्या बांधणे, फांद्याची विरळणी, पाने काढणे, घड काढणे या कामांवर भर देणे आवश्यक आहे. वेलींचे विस्तार व्यवस्थापन योग्य रीतीने केल्यास बागेत रोगांचा प्रादुर्भाव तुलनेने कमी होतो. आणि उत्तम दर्जाचे द्राक्ष उत्पादन घेणे शक्य होते.


अशाप्रकारे फांद्या बांधून घ्याव्यात.

## फांद्या बांधणे

- बागेतील कॅनॉपी व्यवस्थापनासाठी शूट पोझिशनिंग हा महत्त्वाचा घटक आहे. योग्य शूट पोझिशनिंगमुळे पानाचे एकसमान वितरण तयार होण्यासाठी अंकुरांना (शूट) योग्य दिशा मिळते. त्यामुळे द्राक्ष घडांना योग्य सूर्यप्रकाश मिळतो. परिणामी, घडाची प्रत सुधारते. रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो. योग्य कॅनॉपी व्यवस्थापनामुळे बागेत चांगले वातावरण निर्माण होऊन कीड, रोगांचे योग्य नियंत्रण करणे शक्य होते.

## फांद्याची विरळणी

- विरळणी केल्यामुळे कॅनॉपीची घनता कमी होते. हवेच्या चांगल्या हालचालींमुळे रोगांचा प्रादुर्भाव तुलनेने कमी होतो. तसेच बुरशीनाशकांचा द्राक्षवेलीमधील प्रवेश सुधारतो. घडांवर सावली पडत नाही. त्यामुळे घडांना पुरेसा सूर्यप्रकाश मिळतो आणि फळधारणेची क्षमता सुधारण्यास मदत होते.

## पाने काढणे

- पान काढून टाकणे म्हणजे घडांच्या आसपासच्या भागातील वेलीतून पाने काढून टाकण्याची प्रक्रिया होय. त्यासाठी सुरुवातीची २ ते ३ पाने काढावीत.

## फायदे

- बागेमध्ये हवा खेळती राहते.
- बुरशीनाशक किंवा कीटकनाशकांची फवारणी योग्य त्या ठिकाणी होते. त्यामुळे रोग नियंत्रण लवकर होण्यास मदत होते.
- फळधारणा क्षमता सुधारते.
- बागेत योग्य वातावरण निर्मिती होऊन द्राक्षाचा रंग आणि चव सुधारते.

- डॉ. स. द. रामटेके, ९४२२३१३१६६, (प्रमुख शास्त्रज्ञ, राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, मांजरी, पुणे)

- कीडनाशकांच्या शिफारशी लेबल क्लेमप्राप्त किंवा जॉएंट ॲग्रेस्कोप्राप्त आहेत.
- फवारणीचे प्रमाण हाय व्हॉल्यूम फवारणी पंपासाठीचे आहे.
- खरेदीवेळी पक्के बिल घ्यावे.
- बॅन किंवा 'रेस्ट्रिक्टेड' आहे का पाहावे.
- लेबल क्लेम वाचावेत.
- पुरेशा ज्ञानाशिवाय रसायने एकमेकांत मिसळू नयेत.
- रसायनांचा गट तपासावा.
- पीएचआय, एमआरएल तपासावेत.
- पेरणी वा लागवडीपूर्वी संबंधित बियाणांवर कोणती बीजप्रक्रिया केलेली आहे, हे तपासूनच पुढील बीजप्रक्रिया करावी.
- मधमाशी, मित्रकीटकांना हानिकारक कीडनाशकांचा वापर टाळावा.
- पीक फुलोरा अवस्था लक्षात घेऊन कीडनाशकांचा समंजस वापर करावा.


## छोट्या जाहिराती

व्यवसायवृद्धीचा मार्ग

| क्लासिफाइड | विशेष योजना: |
| --- | --- |
| सहा ओळींसाठी फक्त ५०० रूपये, पुढील प्रत्येक जादा ओळीस रु. ८५/- | २ पेड + १ फ्री, ३ पेड + २ फ्री, ५ पेड + ५ फ्री, १०पेड + १२ फ्री |

### खते / औषधे

#### खते / औषधे विक्री

**हेरा फार्म्स देशी** गाईंच्या शेणा पासून बनविलेले गांडूळखत व वर्मिवॉश उपलब्ध. 1, 2, 10, 40 K.G. व बल्कमध्ये. संपर्क: 9822029829, 9822850829.

#### खते/ औषधे निर्मिती/ वितरण

**पीजीआर किटकनाशके** मायक्रोन्युट्रियंट स्वतः बनविण्याचे प्रशिक्षण त्याचप्रमाणे होलसेल भावात मटेरिअल मिळेल. संपर्क सॅव्ही लाईफ सायन्स मो. : ८९७५७२७३६०.

### सल्ला- सेवा- मार्गदर्शन

#### शेतीविषयक चर्चासत्र/ कार्यशाळा/ प्रदर्शन




### बी - बियाणे

#### बियाणे / रोपे विक्री

**पांढरे जांभुळ, सिताफळ,** आंबा, पेरु, चिकु ,संत्रा,मोसंबी, लिंबु, खजुर,गळलिंबु रोपे, कलमे मिळतील. वसंत नर्सरी, सिंदखेडराजा. मो. ९४२३३ ३८८२६, ९५५२०३०८२६

### शेतीविषयक अन्य विषय

#### फलोत्पादन/ फळप्रक्रिया

**शेती फळबागा मजुरांसह** लागवड जोपासना व मार्केटिंग करून देऊ. तयार फळबागांचे मेंटेनन्स व कमी खर्चाचे जिवंत काटेरी कंम्पाऊंड ही करतो. www.agrifrutfarming.com 9850601641

#### वनीकरण / वृक्षारोपण

**पारंपारिक पिकपद्धती बरोबर** महोगनी वनशेतीद्वारे नियमित व दिर्घकालीन एकरक्कमी उत्पन्नांची हमी. मिटकॉन या नामांकित संलग्न संस्थेद्वारा कार्बन क्रेडीटचा प्रति एकर प्रति वर्षे अधिक मोबदला पीक व्यवस्थापन लाकूड कापणी, वाहतूक व हमीदराने खरेदीचा करार या नाविण्यपुर्ण प्रकल्पात सहभागी होण्यासाठी आजच संपर्क करा. महोगनी विश्व ॲग्रो प्रा.लि. पुणे 9112150027, 9119456969, 9022364020.

### पशुधन व्यवसाय

#### पशुखाद्य

**दुधाचे उत्पन्न वाढीसाठी** सुपर नॅपिअर गवता पासून तयार केलेले उत्तम मुरघास केवळ ४ रुपये किलो दराने १टन पोत्यात.तावशी, पंढरपूर येथे उपलब्ध. 9028128802

### जमीनविषयक

#### जमीन कसण्यासाठी/ मक्त्याने घेणे

**पाहिजे - कोल्हापूर** जिल्ह्यात मलकापूर, बांबवडे, कोकणभाग परिसरात पाणी, वीज, रस्ता सोय असणारी चांगल्या प्रतीची जमीन भाड्याने पाहिजे. संपर्क : मो.९८५०७०१३५४

### शेतीविषयक व्यवसाय

#### इतर व्यवसाय

**शेती व पोल्ट्रीसाठी** ताडपत्री उन्हात लवकर खराब न होणारी, टिकाउ, ८ फूट उंची पर्यत जॉईन्ट नसलेली, पाहिजे त्या साईज सध्ये मिळेल मो- ०२२-४१३११७८८/ ९२२२७७४१४३.

### व्यवसायविषयक

#### व्यवसाय धंदा

**शेतकरी मित्रांनो नव्या युगाचा** नवा व्यवसाय अल्प वेळेत कमी भांडवलात दररोज १२०० रु. ते २००० रु. कमवा. वय २४ वर्षे ते ५५ वर्षे. संपर्क : ७७५८९५८२०८.

### शैक्षणिक

#### पुस्तक/ लायब्ररी

**वारकरी संताचे विचार,** चरित्र, अभंग निरुपण करणारे शुद्ध वारकरी सांप्रदायिक ''वारकरी दर्पण'' मासिकाचे सभासद व्हा! अंक दर महिन्याला पोस्टाने घर पोच मिळेल.मो.9309355930.

**वाचकांसाठी निवेदन**
सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत 'सकाळ' व्यवस्थापन हमी देऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी.
-वरिष्ठ व्यवस्थापक, अॅग्रोवन

### जाहिरातीसाठी संपर्क

- पुणे- शितल : ९९७५७६५८३८
- सातारा- संकेत : ९९७५६२६४३९
- सांगली - शीतल : ९८८११२९२९३
- नाशिक- चेतन : ९१६८६६११५८
- औरंगाबाद- दत्ता : ८६२४०२३२५६
- अहमदनगर- सचिन : ८८८८९६६५८२
- नागपूर- प्रशांत : ८८८८७१८६००
- अकोला- महेश : ९०११०६१९३३
- जळगाव- भूषण : ९९६०४१११९६
- सोलापूर- पियुष : ९३७३९७९८०८